क्रमांक:१६०६०/क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक: २१ ऑक्टोबर, २०२१.

**संदर्भ- या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक ३१०३०/क-१, दिनांक ४ डिसेंबर, २०१८.**

**:: परिपत्रक ::**

या सचिवालयातील उप सचिव व त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानमंडळाच्या समित्यांचे मुंबईबाहेर तसेच राज्याबाहेर अभ्यास दौरे आयोजित करण्यात येतात. सदरहू दौऱ्याच्या वेळी समितीस सहाय्य करण्यासाठी कक्षातर्फे त्या-त्या कक्षातील कर्मचारी, कक्ष अधिकारी, अवर सचिव (समिती), अवर सचिव, उप सचिव व त्यावरील दर्जाचे अधिकारी सहभागी होत असतात. उप सचिव व त्यावरील दर्जाचे अधिकारी यांच्याकडे या सचिवालयातील समिती कक्षांचे त्याचप्रमाणे सभागृहाशी संबंधित कक्षांचे कामकाज सोपविण्यात आलेले आहे. उप सचिव दर्जाचे अधिकारी त्यांच्या अधिनस्त असलेल्या कक्षांच्या कामकाजावर नियंत्रण अधिकारी म्हणून कार्यरत असल्यामुळे असे अधिकारी समिती समवेत मुंबईबाहेरील दौऱ्यावर गेल्यास त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या अन्य कक्षांच्या कामकाजावर परिणाम होतो. त्यामुळे संबंधित कक्षांचे कामकाज प्रलंबित राहते व तातडीची प्रकरणे निर्णयाअभावी निकाली काढण्यात अडचणी निर्माण होतात. त्याचप्रमाणे उप सचिव व त्यावरील दर्जाचे अधिकारी मा. पीठासीन अधिकारी /प्रधान सचिव यांना चर्चेस उपलब्ध होत नाहीत. शासकीय कार्यालयीन कामकाजाच्या प्रक्रियेमध्ये उप सचिव व त्यावरील अधिकारी हे निर्णय प्रक्रियेतील महत्वाचा घटक आहेत. त्यामुळे या अधिकाऱ्यांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग आवश्यक असल्याने त्यांची मुख्यालयाच्या ठिकाणी उपस्थिती ग़रजेची आहे.

कार्यालयीन कामकाजाच्यादृष्टीने या सचिवालयातील उप सचिव व त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांनी विधानमंडळ समित्यांचे मुंबई बाहेरील अभ्यास दौरे करु नयेत असा निर्णय मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचा समावेश असलेल्या मा.मंडळाने माहे डिसेंबर, २०१८ मध्ये घेतलेला आहे. यासंदर्भात संदर्भाधीन परिपत्रकान्वये उप सचिव व त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे.

..२/-

त्याचप्रमाणे मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.संसदीय कार्य मंत्री व मा.विरोधी पक्ष नेते यांच्या समवेत गटनेते व विधानमंडळ समित्यांचे समिती प्रमुख यांच्या दिनांक २५ मे, २०११ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार विधानमंडळ समित्यांचे समिती प्रमुख व समिती सदस्य यांनी विधानमंडळ समित्यांच्या बैठका, समिती समोर व्यक्तींना बोलविणे, समितीचे अहवाल, विभागीय / जिल्हा बैठका व राज्याबाहेरील दौरे आयोजित करतांना पाळावयाची मार्गदर्शक तत्त्वे / सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार समित्यांचे कामकाज करण्याची सर्व संबधित अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

सद्य:स्थितीत विधानमंडळ समित्यांचे कामकाज सुरु झाले असून समित्यांमार्फत अभ्यासदौरेही आयोजित करण्यात येत आहेत. यामध्ये मुंबई बाहेरील दौऱ्यांचाही समावेश आहे. मुंबई बाहेरील दौऱ्यास या सचिवालयातील उप सचिव दर्जाचे अधिकारीही उपस्थित राहत असल्याचे निदर्शनास येत आहे.

अत: मा. मंडळाने उप सचिव व त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांनी मुंबई बाहेरील दौऱ्यास उपस्थित न राहण्याबाबत माहे डिसेंबर, २०१८ मध्ये दिलेल्या निदेशांचे उप सचिव दर्जांच्या अधिकाऱ्यांकडून पालन होणे अपेक्षित आहे, त्याबाबतही त्यांनी दक्षता घ्यावी.

(राजेन्द्र ग. भागवत)
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.

२) मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

३) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

४) मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा/विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

..३/-

५) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.

७) सर्व समिती प्रमुख यांची कार्यालये.

८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.

९) संगणक (क-२) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (संकेतस्थळावर अपलोड करण्याकरिता).

१०) निवडनस्ती.